# Initiative 40

## Shikshan Rath for Reaching the Unreached

*श्री.रविंद्र भाईदास पाटील*

*जिल्हा परिषद कन्या शाळा प्रकाशा ता.शहादा जिल्हा नंदुरबार*

*महाराष्ट्र*

*ravi9405873331@gmail.com*

शाळेचा संदर्भ

जिल्हा परिषद कन्या शाळा प्रकाशा, तालुका -शहादा ,जिल्हा -नंदुरबार ,ही महाराष्ट्रातील १००%आदिवासी बहुल ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत व्यवस्थापन होणारी फक्त मुलींची शाळा आहे .

कोविड - १९ या महामारीमुळे शाळा बंद असल्याने खालील आव्हानांना सामोरे जावे लागले

१) शैक्षणिक वर्ष२०१९२०संपेपर्यंत विद्यार्थ्यांची संपादणूकही मागील झालेल्या परीक्षेच्या गुणांवरून ठरविले त्यानुसार १मे ला निकाल हा ऑनलाईन ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हे आव्हान होते.

२) शैक्षणिकवर्ष२०२०-०२१ ची सुरुवात दाखलपात्र विद्यार्थिनींचे प्रवेश देण्याचे काम सुरू करणे यातही शाळा बंद असल्याने अनेक पालकांपुढे प्रश्नचिन्ह उभे राहत होते .

३) अनेक विद्यार्थिनींचे पालक हे गोरगरीब मोलमजुरी करणारे असल्याने अँड्रॉइडफोन नसल्याने ऑनलाईन शिक्षणासाठी व्हाट्सअपग्रुप तयार करण्याचे आव्हान होते.

४) शासनाच्या दूरदर्शनच्या माध्यमातून टिलीमिली कार्यक्रमाची पालकांकडे दूरदर्शन संचाचा अभाव व त्यामुळे विद्याथी लाभ मिळवून देणे हे एक आव्हान होते.

५) प्रत्यक्ष अध्यापनाकरिता विद्यार्थिनींचे गटकार्य हे त्यांच्या गल्लीत जाऊन सुरू करण्यासाठी माजी विद्यार्थिनींना 'शिक्षकमित्र' म्हणून त्यांची मदत घेत असताना विविध प्रकारची आव्हाने होती.

६) राष्ट्रीय आपत्ती असल्याने शिक्षकांना कोविड-१९ साठी विविध प्रकारचे सर्वेक्षण,जनजागृती, माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम, रेशन दुकानावर निरीक्षण काम, तद्रंतर लसीकरण जागृती, नियमित लसीकरण अहवाल, कोविड नियंत्रण कक्षावरील निरीक्षण कामे आदी अनेक कामांमुळे विद्यार्थी अध्ययनात अडचणी हे एक आव्हान होते .

७) शाळा बंद असल्याने विद्यार्थिनींचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत होते, शाळेत नियमित आरोग्य तपासणी होते तथा शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून विद्यार्थिनींना माध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत सकस आहार मिळत असतो तो पूर्णपणे बंद झाला होता विद्यार्थिनींना त्याबदल्यात कोरडा शिधा वाटप होत होता ,परंतु त्यात प्रत्यक्ष तो विद्यार्थिनींना मिळत होता का? यावर प्रश्नचिन्ह होते

८) लॉकडाऊन असल्याने मोल-मजुरी करणाऱ्या पालकांनाही कुठले काम मिळत नव्हते आर्थिक दृष्ट्या पालक हलाखीचे दिवस काढत होते त्यातच शाळा बंद असल्याने ते आपल्या पाल्यांना शेतात काम करणे, गुरे सांभाळणे, लहान भावंडांना सांभाळणे, आदि काम करण्यास भाग पाडत होते .काहीतर स्थलांतराच्या बेतात होते अशा परिस्थितीत विद्यार्थिनींना शाळेच्या प्रवाहात आणण्याचे एक मोठे आव्हान होते .

शिक्षणातील अंतर कमी करण्यासाठी नाविन्यपूर्ण नेतृत्व पद्धती

१) शाळाबंद ... पण शिक्षणआहे . . या धोरणांन्वये ऑनलाईन शिक्षणासाठी व्हाट्सअप ग्रुप तथा दूरदर्शनच्या माध्यमातून अल्पसा प्रतिसाद व गटकार्याची फलनिष्पत्ती व पालकांची विस्कटलेली आर्थिक परिस्थिती पाहता विद्यार्थिनींचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत होते व आपसूकच विद्यार्थिनी ह्या शालेय प्रवाहापासून लांब जाताना दिसून येत होत्या यासाठी १ऑगस्ट 2020 लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने कोविड -१९ नियमांचे पालन करीत कोणतीही भीती मनात न बाळगता सुरक्षिततेचा विश्वास बाळगीत सर्व सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन व पालकांना समज देत पालक सभा घेतली.

२) पालक सभेतून शाळा बंद पण शिक्षण आहे या मोहिमेअंतर्गत येणाऱ्या अडचणी सोडविणे कामी विचार विनिमय केला शिक्षण क्षेत्रात कार्य करणारे अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली .

३) नवीन कल्पना, नवीन पद्धती याविषयी इंटरनेटद्वारा माहिती मिळवली स्वानुभव व स्वनिरीक्षणाने विविध माध्यमांद्वारे उदाहरणार्थ दूरदर्शन वरील चालता बोलता कार्यक्रम विविध कंपन्याद्वारा होत असलेली होमडिलिव्हरी या पद्धतीनुसार शिक्षणासाठी काही नवीन करता येईल का ? यावर चर्चा झाली त्यात विद्यार्थिनींना शाळेत येण्यास आवडावे म्हणून शाळेच्या इमारतीला रेल्वेगाडी आकार व रंगरंगोटी केली, त्याचा परिणाम मुली आवडीने कुतुहलाने शाळेत येऊ लागल्या, गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले हा अनुभव घेतला असल्याने सद्यस्थितीत शाळा बंद असल्याने शाळाच जर विद्यार्थिनींच्या घरापर्यंत नेली तर या विचारातून " चालती फिरती डिजीटल शाळा " ही कल्पना सुचली.

४) 'शिक्षणरथ' या चालत्या फिरत्या डिजिटल शाळेसाठी स्वत:च्या चारचाकी गाडीचा वापर करून विद्यार्थी आकर्षित होण्याकरिता शैक्षणिक साहित्यरूपी डिजिटल बॅनर बनवून गाडीला लावून गाडी सजवली .

५) गाडीच्या मागील बाजूस डिक्कीत ३२" इंची LED Android TV संच बसविला. विद्यार्थ्यांपर्यंत आवाज पोहचण्यासाठी वायरले समाईक व स्पीकर संच बसविला. हे सर्व विद्युत उपकरणे चालविण्यासाठी इन्व्हर्टर बसविले .

६) विविध शैक्षणिक इयत्तेनुसार विषयानुरूप घटकानुसार ऑडीओ, व्हिडिओ क्लिप प्रदर्शित करण्यासाठी पेन ड्राईव्हमध्ये संग्रहित करून त्याचा वापर केला.

७) थेट प्रक्षेपणासाठी, ऑनलाइन अध्यापनासाठी मोबाईल इंटरनेटद्वारा Hotspot ने जोडणी करण्याची व्यवस्था करण्यात आली.

८) गृहपाठ देण्यासाठी स्वाध्याय पुस्तिकेच्या हार्ड कॉपीचा वापर करून उपयोग घेतला.

९) कोविड-१९ प्रादुर्भावावर मात करण्यासाठी सर्व विद्यार्थिनींसाठी मोफत मास्क वाटप करण्यात आले. तसेच नियमित सॅनिटायझरचा वापर करण्यात आला प्रत्येकवेळी जागा निर्जंतुकीकरण करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा वापर करण्यात आला.

कोरोना अपडेट

**नंदुरबार**

| | |
|---|---|
| पॉझिटीव्ह | ५५१६ |
| मयत | १२६ |
| कोरोना मुक्त | ४८५६ |

# प्रकाशातील शिक्षक दाम्पत्याने बनविला शिक्षण रथ

**पाडळदा :** कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने देशभरातील शाळा बंद असताना प्रकाशा येथील कन्या शाळेच्या शिक्षक दाम्पत्याने शिक्षण रथ तयार केला असून फिरत्या डिजिटल शाळेद्वारे आदिवासी श्रमिकांच्या वस्तीत जावुन वृक्षांच्या सावलीत विद्यार्थ्यांना शिकवण्याचा उत्कृष्ट उपक्रम हाती घेतला आहे.

प्रकाशा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेतील मुख्याध्यापक रवींद्र पाटील व शिक्षिका प्रियंका पाटील यांनी शाळा बंद .. पण शिक्षण सुरु या शासनाच्या धोरणाची प्रेरणा घेऊन स्वखर्चाने शिक्षण रथ तयार करून फिरती डिजिटल शाळाच विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत नेली आहे. शहादा तालुक्यातील सुमारे पाच किलोमीटर विस्तार असणाऱ्या प्रकाशा या गावात खाणगा हाटी, भवानी हाटी, मुंजडा हाटी, बाजार चौक, नागबरडा हाटी, पिप्पर हाटी यासारख्या विविध हाटींमधून गरीब घरातील विद्यार्थिनींनी कन्या शाळेत प्रवेश घेतला आहे. शाळा बंद असताना ऑनलाइन शिक्षण हा पर्याय सर्वच गोरगरीब विद्यार्थ्यांना शक्य झालेले नाही. किंबहुना त्याची एवढी परिणामकारकता दिसून आली नाही.

म्हणून येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या शिक्षकांनी आपल्या स्वतःच्या कारमध्ये एलईडी अँड्रॉइड टीव्ही लावून, सोबत इन्वर्टर व माइक स्पीकर बसवून 'शिक्षण रथ' च्या माध्यमातून गावातील प्रत्येक हाटीत गरिबांच्या वस्तीत जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष डिजिटल माध्यमातून तसेच ऑफलाइन पद्धतीने गटकार्य देऊन शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. यासाठी शिक्षकांनी त्या-त्या हाटीत विद्यार्थ्यांचे एक ते चार वर्गांचे एकत्रचार वर्गांचे एकत्रित गट करून, सामाजिक अंतराचे तसेच कोरोनाबाबतच्या शासकीय नियमांचे पालन करून मोकळ्या जागेत सकाळी दहा ते एक या वेळेत नियोजनानुसार प्रत्येक हाटीत आठवड्यातील वारानुसार शिक्षण देण्याचे कार्य अविरत सुरु ठेवले आहे. यात नंदुरबार येथील डाएट संस्थेच्या मार्गदर्शनाने शिक्षकांनी स्वखर्चाने सर्व विद्यार्थिनींना स्वाध्याय पुस्तिका वाटप केले आहेत. त्या सोडवून घेणे व तपासण्याचेही कार्य केले जात आहे. सोबतच कोरोनाबाबत घ्यावयाची काळजी, उपाययोजना, मास्क वापरणे, वारंवार हात धुणे तसेच 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' याबाबतही जनजागृती करण्यात येत आहे. या संकल्पनेतून मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी शिक्षण रथाच्या माध्यमातून शाळा आपल्या दारात हा उपक्रम राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा केलेला हा प्रयत्न आदर्शवत व अनुकरणीयच आहे. त्यांच्या या उपक्रमाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षणापासून वंचित



राहण्याचे प्रमाणही कमी होणार आहे. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमात केंद्रप्रमुख आर.एम. धनगर, भरत पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था शाळा व्यवस्थापन समिती शिक्षक भाऊराव कोकणे, नूतन पाटील, प्रियंका पाटील, अनुराधा गव्हाणे यांच्यासह इतरांचे सहकार्य लाभत असल्याची माहिती मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी दिली आहे.







सकाळ

# स्वखर्चातून केली डिजिटल शाळा

## प्रकाशाच्या शिक्षक दांपत्याचा उपक्रम : स्वतःच्या चारचाकीलाच बनविले शिक्षणाचा रथ

कमलेश पटेल : सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. ३० : प्रकाशा (ता. शहादा) येथील जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक रवींद्र पाटील व प्रियंका पाटील यांनी स्वतःच्या संकल्पनेतून स्वः मालकीच्या चारचाकी गाडीला शिक्षणाचा रथ बनवून शिक्षण व शाळा आपल्या दारी उपक्रम राबविणे सुरू केले आहे. या शिक्षक दाम्पत्याने चालत्या-फिरत्या डिजिटल शाळेची निर्मिती करून लहानग्यांना शिक्षणाचे बाळकडू देत एक आदर्श निर्माण केला आहे.**

शाळा बंद असताना तसेच कोरोनाचा प्रादुर्भाव बघता प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यास पोचवण्यासाठी ऑनलाइन शिक्षण हा येथील ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना सोईस्कर पर्याय ठरू शकला नाही. किंबहुना त्यांची एवढी परिणामकारकता दिसून आली नाही, म्हणून येथील शिक्षकांनी स्वतःच्या कारमध्ये एलईडी अँड्रॉइड टीव्ही लावून सोबत इन्व्हर्टर व माइक स्पीकर बसवून या शिक्षण रथाच्या माध्यमातून गावातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष डिजिटल शिक्षण देण्यास मदत झाली.

येथील शिक्षकांनी त्या त्या भागातील विद्यार्थ्यांचे एक ते चार वयाचा एकत्रित गट करून सामाजिक अंतराने सकाळी दहा ते एक या वेळेत आठवड्यातील वारानुसार शिक्षण देण्याचे कार्य करण्यात येत आहे. यासाठी शिक्षकांनी स्वखर्चाने पदरमोड करून सर्व विद्यार्थिनींना स्वाध्याय पुस्तिका वाटप केल्या आहेत. त्या सोडवून घेणे व तपासण्याची कामेही केली जात आहेत. त्याच बरोबर या आजाराचा काळात घ्यावयाची काळजी, मास्क वापरणे, वारंवार हात धुणे तसेच माझे कुटुंब माझी जबाबदारी याबाबतीतही जनजागृती करण्यास मदत होत आहे. तसेच सोबत मोफत मास्क वाटप करण्यात येत आहेत.



प्रकाशा (ता. शहादा) : डिजिटल शाळेद्वारे ज्ञानार्जन करताना शिक्षक.

### शाळा आपल्या दारी उपक्रम

विद्यार्थी शाळेत येऊ शकत नाही, परंतु शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत जाऊ शकतात. या संकल्पनेतून रवींद्र पाटील यांनी शिक्षणरथाच्या माध्यमातून शाळा आपल्या दारी हा उपक्रम राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा एक प्रयत्न केला आहे. या कार्यासाठी कन्या शाळेचे शिक्षक भाऊराव कोकणी, नूतन पाटील, प्रियंका पाटील व अनुराधा गव्हाणी प्रयत्न करीत आहेत तसेच केंद्रप्रमुख आर. आर. धनगर तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार यांचे मार्गदर्शन लाभले.

Nashik, Dhule-Today
01/10/2020 Page No. 4

# रयतेचा वाली

डिजिटल शैक्षणिक दैनिक रयतेचा वाली ~ वर्ष २ - अंक ०९६ ~ गुरुवार ०१/१०/२०२० पान ०५

## प्रकाशा केंद्रातील कन्या शाळेचा 'शिक्षण रथ' नावाचा आदर्शवत उपक्रम

[illegible]







मुलींनी शिकण्याचे सुनिश्चित करण्यासाठी पालकांसह समाजाचा सहयोग

१) शिक्षकांनी “ शिक्षणरथाच्या” उपक्रमाद्वारे गरीब व होतकरू मुलींनी चांगला प्रतिसाद देवून उपस्थिती दाखवून गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला.

२) शिक्षकांनी पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत शेतीच्या कामावर व इतर कामासाठी पाल्यांना घेवून न जाता तसेच विद्यार्थीनीना शिक्षणरथाची ओढ असल्याने त्यांच्या शिकण्यात गती आली.

३) या शिक्षणरथाच्या कार्याचा प्रभाव जनसमुदायावर उत्तम झाला , यात व्यावसायिक, राजकीय, धार्मिक कुठल्याही प्रचाराचा भाग नसून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर असल्याने जनमानसातील लोकांनी मनापासून स्वीकार केला आहे.

४) शासकीय व सामाजिक अभियानाचा जनजागृतीसाठी या रथाचा उपयोग होऊ लागला .तसेच या रथाच्या शैक्षणिक कार्यामुळे समाजातील काही व्यक्तींनी, पालक ,शा.व्य.स.सदस्य (SMC ) पुढे येवून स्वप्रेरणेने मास्क, सॅनिटायझर वाटप जागा स्वच्छ करणे,तसेच शैक्षणिक साहित्य विद्यार्थिनींना देणे आदी मदत केली.

५) समाजातील गरीब मोलमजुरी करणारे अशिक्षित पालकांच्या मनात शाळा बंद पण शिक्षण सुरु आहे . ते ही ऑनलाईन किंवा दूरदर्शनच्या माध्यमाने सुरु आहे. परंतु यापैकी आमच्या मुलांना कोणतीही गोष्ट साध्य होणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे आमची मुले शिक्षण घेवूच शकणार नाही. किंवा आम्हीही काहीच शिकवू शकणार नाही या विचाराने शिक्षणाविषयीची आशाच सोडून दिली होती.त्यामुळे मुलींना काही पालक शेतमजुरीसाठी घेवून जात होते परंतु शिक्षणरथाच्या उपक्रमाने शिक्षणाविषयीच्या त्यांच्या मनातील आशा पल्लवित होऊन पालकांच्या व विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंदाचा भाव व्यक्त होताना दिसत होता.

६) ५ सप्टेंबर २०२० शिक्षकदिनानिमित्त इतर शिक्षकदिनी विद्यार्थिनी शिक्षक बनून वर्गात शिकविण्याचा आनंद घेतात. एक दिवसाची शिक्षिका होण्याचा आनंद अनुभवतात. परंतु या वर्षी शाळा बंद असल्याने इयत्ता तिसरी व चौथीच्या मुलींना वाटत असेल की या वर्षी एका दिवसाची शिक्षिका होण्याची संधी मिळणार नाही. याचे दुःख होते परंतु या उपक्रमातून गटागटाने या दिवशी शिक्षिकेची भूमिका करण्यास संधी देण्यात येऊन शिक्षकदिन साजरा झाला,ज्यात पालकांचे उत्तम योगदान प्राप्त झाले.

७) २ ऑक्टोबर २०२० महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनींना अगोदरच वक्तृत्व स्पर्धेसाठी नाव देण्यात आली होती. त्या दिवशी स्पर्धा घेऊन दुसऱ्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते व शा.व्य.स.सदस्य व पालकांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करून सदर कार्यक्रम आनंदात साजरा झाला.

८) १५ ऑक्टोबर २०२० या दिवशी मा. डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस व जागतिक हात धुवा दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या ठिकाणी ऑनलाइन व्हिडिओ कॉलिंगद्वारा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार येथील मा. प्राचार्य डॉ. जगराम भटकर यांनी वाचनसंस्कृती रुजावीयासाठी तथा करीत असलेले कार्य यास शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले आणि मराठी भाषा विभागप्रमुख वरिष्ठ अधिव्याख्याता श्री रमेश चौधरी सर यांनी whats app व्हिडीओ कॉलिंगद्वारे प्रत्यक्ष विद्यार्थिनींचे वाचन घेतले व मार्गदर्शन केले. मा. डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांच्या विषयी माहिती देण्यात आली व शिक्षकांनी हात धुवादिन असल्याने हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. या कार्यक्रमास पालक बंधू-भगिनी यांनी पाठींबा देऊन सहभाग घेतला.शाळा बंद असल्याने वर्गमैत्रिणी एकत्र येत नव्हत्या या उपक्रमाच्या माध्यमातून एकत्र येऊन सामाजिक अंतराचे पालन करून खेळणे गप्पा मारणे, कोडे सोडविणे, नृत्य, नकला करणे, मातीकाम, कागदकाम करणे, आदी कृती करू लागल्या.

९) या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना एवढी आतुरता निर्माण झाली की ते रथ येण्याच्या अगोदरच तेथील जागा स्वच्छ करणे, सामाजिक अंतरासाठी चौकोन करणे, इतर विद्यार्थिनींना अगोदरच बोलावून बसविणे, वाट पाहणे, पालकांना सोबत आणणे, रथ आल्यावर टाळ्या वाजून स्वागत करणे. अश्या पद्धतीने शिक्षकांच्या पुढाकारातून पालक, शा.व्य.स. यांच्या सहकार्यातून विद्यार्थिनीच्या शिकण्याच्या प्रक्रियेत उत्साह व गती निर्माण झाली.

https://youtu.be/nZRRDKS-Q5A
https://youtu.be/g_rMSGhxsHw
https://youtu.be/biGf2OCgcnI
https://youtu.be/jFi1iXhYqcA
https://youtu.be/dL5Exax26do

पूढील दिशा

१) कोविड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे देशभरातील संपूर्ण शाळा बंद असल्याने, शाळा बंद पण . . .शिक्षण सुरु आहे . . . या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने ऑनलाईन शिक्षणासाठी whats app ग्रुप बनविले , दूरदर्शनवरील टिलीमिली हा शालेय कार्यक्रम पाहण्यासाठी प्रवृत्त करणे व गटागटाने वाचन, लेखन सराव व गणिती क्रियांचा सराव घेणे आदी प्रयत्न निष्फळ झाल्याने या सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा शिक्षणरथाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षणात अभिरुची निर्माण होताना दिसून आला.

२) विद्यार्थिनी उत्सुर्तपणे सहभाग घेऊन विविध शैक्षणिक कृती स्वत:हून करू लागल्या, शिक्षणपूरक उपक्रमात सहभाग नोंदवू लागल्या. दिलेल्या स्वाध्याय पुस्तिका नियमित सोडवू लागल्या. या सर्व कृतीतून पालक वर्गाकडून तसेच समाजातील प्रतिष्ठित शिक्षणाप्रती प्रेम

असलेल्या व्यक्तींकडून या उपक्रमाद्वारे  सर्वांचे कौतुक करताना आढळून आले.  याचा परिणाम वृत्तपत्रे व तसेच खाजगी व सरकारी वृत्तवाहिन्या यांनी देखील याची दखल घेतली. त्यामुळे आम्हाला अधिक प्रेरणा मिळत गेली.  या शिक्षणरथामुळे शिक्षणप्रवाहापासून वंचित होणाऱ्या, काही स्थलांतरीत होणाऱ्या मुली शिक्षण प्रवाहात आल्या. त्याचाही एक वेगळा आनंद अनुभवला.

३) या सर्व कार्यामुळे शैक्षणिक वर्ष 21 -22  साठी दाखलपात्र विद्यार्थ्यांनींचे सगळ्यात जास्त प्रवेश झाले .तथा जे पालक खाजगी शाळेत आपल्या मुलींना प्रवेश घेऊ इच्छित होते त्यांनी त्या ठिकाणी प्रवेश न घेता आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला एकूण दाखल पात्र संख्याही 39  झाली  .

४) कोविड-19 महामारीचा प्रादुर्भाव बऱ्यापैकी कमी झाला असल्या कारणाने आम्ही या ठिकाणी शिक्षणरथामार्फत तथा प्रत्यक्ष गटकार्य करून नियमित शासननिर्देशानुसार अध्यापन करीत आहोत

५) पालक,समाज व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सन्माननीय सदस्य तथा ग्रामपंचायत यांचे लाभलेले सहकार्ययामुळे शैक्षणीक वर्ष २०२१-२०२२मध्ये सर्वात जास्त विद्यार्थीनीनी प्रवेश घेतला.

६) शाळेने केलेली भौतिक प्रगती – यात संपूर्णपणे शाळा  रेल्वे डब्याप्रमाणे बाह्यांग व आतून सर्व वर्गखोल्यांचे केलेले शैक्षणिक साहित्यरुपी रंगकाम केले, ज्यातून विद्यार्थिनी शाळेत रममाण व्हाव्यात , शिक्षण प्रक्रियेत कमीतकमी अडचणी याव्यात असे नियोजन करण्यात आले.

७) शाळेतील डिजिटल क्लासरूम व व्हर्च्युअल क्लासरूम आदि सुविधा ,समाज सहभाग व शिक्षक सहभागातून तयार केल्या  ज्यात शाळा व्यवस्थापन समिती ,पालक गावकरी याचं अधिकाधिक सहभाग घेण्यसाठी बैठका व उपक्रमांचे नियोजन केले.

८) पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुसज्ज मुलींचे स्वच्छतागृह, हॅन्डवॉश स्टेशनची निर्मिती  इत्यादी भौतिक सुविधांची सोय करण्यात आली  व विद्यार्थीनीना  सर्व अद्ययावत साहित्य प्राप्त होण्यासाठी गावकऱ्यांचे व पालकांचे सहकार्य घेण्याबाबतचे नियोजन करण्यात आले.

९) माजी विद्यार्थिनींचा शाळेबद्दलचा अनुभव,त्यांची गुणवत्ता, शाळेने राबवावयाचे  सहशालेय उपक्रम, विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यासाठी  वेगळा वेळ राखीव ठेवून प्रेरणा कार्यक्रमाचे नियोजन  क्रीडा स्पर्धेतील यशासाठी नियोजन , परिसर अभ्यास भेटी व सहली  याबाबत नियोजन केले .

कोविड 19 या महामारीची सर्वच जगाने धास्ती घेतली होती तरी या महामारीला न घाबरता आपले दैनंदिन कामकाज करणे आपल्याला अत्यावश्यक होते यात घरी बसून आपल्याला सर्व गोष्टी मिळत होत्या परंतु शिक्षण हे शाळेतच दिले जाते . यासारख्या नैसर्गिक आपत्तींना न भिता त्याच्यावर मात

करीत आपले पुढील आयुष्य व्यतित करायचे असते कारण वेळ ही काय कुणासाठी थांबत नाही . शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे त्यात खंड पडता कामा नये म्हणून आमच्या शाळेच्या वतीने आम्ही घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षण दिले तर नंतर शाळा उघडल्यानंतर आम्ही जो काही कालावधी या महामारीत व्यर्थ गेला आहे तो भरून काढण्यासाठी एक दिलाने झटून आम्ही आमचे ध्येय साध्य करीत राहिला यात विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करीत फक्त त्यांचा गेलेला कालावधी कसा भरून काढता येईल याचा विचार करीत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत राहिलो व करीत आहोत .

https://youtu.be/nZRRDKS-Q5A
https://youtu.be/g_rMSGhxsHw
https://youtu.be/biGf2OCgcnI
https://youtu.be/jFi1iXhYqcA
https://youtu.be/dL5Exax26do

## Conference Presentation

https://docs.google.com/presentation/d/1UZN4Bm9X4TztOTmhNLSm7-WL0SsNUwsR/edit?usp=sharing&ouid=103705547766060522301&rtpof=true&sd=true